आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

या अंकात
पान ०२ नाहि लोक प्रिय तरी
पान ०४ टाऊन हॉल - एशियाटिक लायब्ररी
पान ०६ महामहिम मंडळींचा महंत मार्ग!
पान ०७ मार्जार कुळातील मोठे प्राणी (बिगकॅट्स) - सिंह



पान १०
तन रंगीला
मन रंगीला...
श्री. संजीव कानिटकर

वर्ष ३१ वे अंक तिसरा पृष्ठे ११ मार्च २०२२ www.parlekar.com Registered-RNI no. 54781/92

# लोकमान्य सेवा संघाचे शंभराव्या वर्षात पदार्पण

लोकमान्य सेवा संघाचा शताब्दी वर्षाचा शुभारंभ सोहळा, ११ मार्च २०२२ रोजी संपन्न झाला.

प्रसिद्ध नेत्रशल्यविशारद पद्मश्री डॉक्टर तात्याराव लहाने हे ह्या कार्यक्रमाचे प्रमख पाहुणे तर सारस्वत बँकेचे अध्यक्ष श्री. गौतम ठाकूर हे विशेष अतिथी होते. संस्थेचे अध्यक्ष श्री मुकुंदराव चितळे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

कार्यवाह श्री. महेश काळे ह्यांनी सुरवातीला संस्थेचा ९९ वर्षांचा इतिहास उलगडताना संस्थापकांच्या कार्याचा गौरव केला.

कोणत्याही टीकेची पर्वा न करता अखंडपणे आपण कार्य करत राहावे असे डॉ.लहाने यांनी विषद केले.

किंबहुना तुमच्या कामाबद्दल टीका होत असेल तर तुम्ही योग्य मार्गावर आहात असे समजावे असेही ते म्हणाले.आपल्या भाषणात डॉ .लहाने ह्यांनी आपल्या आयुष्यातील अनेक अनुभव अत्यंत खुमासदार पद्धतीने सांगून पार्लेकरांची मने जिंकली.




सारस्वत बँकेचे अध्यक्ष श्री. ठाकूर यांनी समाज हित आणि विषमता यावर अभ्यासपूर्ण भाष्य केले. शंभर वर्षांपूर्वी असलेली विषमता अजूनही कमी झाली नाही असे आकडेवारीनिशी सांगत त्यांनी खंत व्यक्त केली. फक्त अर्धा टक्के संस्था ह्या १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या असतात आणि ही गोष्ट लोकमान्य सेवा संघासाठी अभिमानास्पद आहे असेही ते म्हणाले. भाषणाच्या शेवटी त्यांनी संस्थेला १० लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

लोकमान्य सेवा संघातर्फे डॉ. लहाने ह्यांचा श्री ठाकूर ह्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष, श्री. मुकुंद चितळे यांनी प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षेत्रात सचोटीने आणि सामाजिक भान ठेवून काम केल्यास सुराज्य निर्मिती होईल असा विश्वास व्यक्त केला.


कार्याध्यक्ष श्री. उदय तारदाळकर ह्यांनी सर्व कार्यकर्त्यांतर्फे आपले विचार मांडताना टिळकांना त्यांच्या कर्तृत्वामुळे लोकमान्य हा किताब मिळाला त्यामुळे आपल्या संस्थेचे नाव लोकमान्य सेवा संघ असे आहे. शंभरीत प्रवेश करत असताना आपली संस्था 'लोकमान्य' राहील ही आपल्या सर्वांची जबाबदरी आहे, त्यासाठी आपल्या संस्थापकांनी घालून दिलेल्या मार्गावर चालून बदलत्या काळात समाजहित जपले पाहिजे असे सांगितले.

आभार प्रदर्शन करताना डॉक्टर रश्मी फडणवीस यांनी संस्थेच्या माजी कार्यकर्त्यांचा आणि पदाधिकाऱ्यांचा गौरव केला.

सोहळ्याची सांगता सुप्रसिद्ध गायक श्री.आनंद भाटे यांच्या सुमधुर गायनाने झाली. बाल गंधर्व यांची अजरामर नाट्यगीते प्रस्तुत करून त्यांनी श्रोत्यांची मने जिंकली. तबल्यावर श्री मुकुंदराज देव आणि श्री. आदित्य ओक यांची संवादिनीची साथ याने कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.

या सोहळ्यास संस्थेचे आजी आणि माजी कार्यकर्ते, अनेक कलाकार आणि रसिक पारलेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय

टिळक मंदिराशी माझी पहिली ओळख व्यायामशाळेमुळे झाली. आमच्या सोसायटीमधील व आजुबाजुची सर्वच मुले व्यायामशाळेत जात. शाळा सुटल्यावर घरी दप्तर टाकायचे आणि टिळक मंदिराकडे धूम ठोकायची हा आमचा शिरस्ताच होता. पुढे वाचनाची गोडी लागल्यावर मंदिराची लायब्ररी होतीच दिमतीला. यथावकाश भाषणे, गाण्याचे कार्यक्रम, नाटके व इतरही अनेक कारणांसाठी पावले टिळक मंदिराकडे वळत होती, आजही वळतात. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मंदिराची आश्वासक साथ पार्ल्यातील आमच्यासारख्या अनेक पिढ्यांना लाभली आहे. मला वाटते त्या अर्थाने प्रत्येक पार्लेकराच्या भावविश्वात टिळक मंदिर गच्च भरलेले आहे.

ज्याप्रमाणे रहायला घर हवे त्याचप्रमाणे समाज घडवायला सामाजिक संस्थासुद्धा हवी असे वाटणारी मंडळी एकेकाळी पार्ल्यात रहात होती हे खरोखरच आपले नशीब. ही ध्येयवेडी लोकं फक्त संस्था सुरू करून थांबली नाहीत तर सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण समाज कसा घडवता येतो याचा आदर्शच आपल्यापुढे ठेवला.आज जर पार्ल्यातील तरूण आयुष्यातील प्रत्येक मैदान गाजवत असतील, अनेक क्षेत्रांत चमकत असतील तर त्याचे श्रेय त्यांच्यावर झालेल्या संस्कारांना व पर्यायाने टिळक मंदिराने पार्ल्याला घालून दिलेल्या सामाजिक घडीला व जगण्यातील शिस्तीला सुद्धा जाते हे विसरून कसे चालेल ? आज सुद्धा लायब्ररी, वैद्यकीय विभाग, सांस्कृतिक शाखा, युवा शाखा, वृद्धाश्रम, नागरिक दक्षता शाखा, ग्राहक पेठ, अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून मंदिर आपली सामाजिक बांधिलकी जपत आहे, वृद्धिंगत करत आहे.

पार्ल्याच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा प्रमुख आधार असणारे आपले टिळक मंदिर शंभराव्या वर्षात पदार्पण करत आहे ही समस्त पार्लेकरांसाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. ह्या दैदिप्यमान प्रवासाला हातभार लावणाऱ्या मंदिराच्या असंख्य निस्वार्थी कार्यकर्त्यांना आमचे शतशः नमन !


आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
रोहित जाधव
marketing@parlekar.com


**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com


# नाही 'लोक' प्रिय तरी

जुन्या पार्लेकरांना लोकेश शेवडे हे एक व्रात्य, खोडकर आणि कलंदर व्यक्तिमत्त्व म्हणून चिरपरिचित आहेत. जुन्या म्हणायचं कारण म्हणजे ते सुमारे ४० वर्षांपूर्वी नाशिकला गेले आणि तिथे अत्यंत यशस्वी उद्योजक, सामाजिक संस्थांचे पालक वगैरे झाले आणि मग




पार्ल्यातल्या बऱ्याचश्या सोज्वळ मंडळींनी सुटकेचा निश्वास सोडला. पण इतक्या वर्षांनीही त्यांच्यातला खोडकर व्रात्यपणा कमी झालेला नाही, हे पाहायचं असल्यास त्यांचा '(लो) कशाहीबद्दल काहीही' हा लेखांचा संग्रह वाचायला हरकत नाही !

नावाप्रमाणेच यातले लेख लोकशाहीबद्दल आहेत, पण कशाहीबद्दल लिहिलेले आहेत का, असं वाटायला लागतं. आजच्या समकालीन जगात अगदी सगळी मूल्यं धाब्यावर बसवणारे नेतेही 'लोकशाही हीच परमपवित्र', असा जयघोष वरवर करत राहतात. तिथे लोकेश मात्र 'लोकशाहीच मुळात घातक', असा दावा करतात. बहुसंख्याकांच्या भावना तर्कापेक्षा जास्त महत्त्वाच्या मानून न्यायालयंही जिथे 'निकाल' देतात, तिथे लोकेश मात्र बहुमताने घेतलेले निर्णय कसे समाजद्रोही असतात, त्याची उदाहरणं देत राहतात. मत दिल्याशिवाय तुम्ही नागरिकच बनू शकत नाही, असा जिथे अट्टाहास धरला जातो, तिथे शेवडेंनी एक आख्खा लेख मतदान न करण्याचा अट्टाहास धरण्यात घालवला आहे. किंबहुना बहुमत हीच जणू लोकशाहीतली सर्वात धोकादायक गोष्ट आहे, असा त्यांचा सूर आहे, त्याला कशाहीबद्दल नाही तर अजून काय म्हणणार ?

त्याहून पुढची गडबड अशी की 'सामान्य माणूस' नावाच्या एका अत्यंत सत्शील, सज्जन व्यक्तीची लोकेश प्रचंड रेवडी उडवतात. चाळीतली उपद्रवी पात्रं, पाटबंधारे खात्यातले भ्रष्ट अधिकारी, रिअल इस्टेटचे 'व्यवहार'करणारा बिल्डर, अशी सामान्य माणसाची वेगवेगळी रूपं ते समोर आणतात. देवदर्शनासाठी पैसे मोजणारे, स्वच्छतेच्या गप्पा मारत स्वतः घाण करणारे, स्वतःच्याच जाती-धर्माला मतदान करणारे, हेही सगळे 'सामान्य माणूस' असतात, याची ते आठवण करून देतात. सामान्य माणसाचं वागणं, त्याचं मतदान, त्याची सामाजिक मांडणी या सगळ्यातच ते सारखी खोट दाखवतात. थोडक्यात काय, तर या सगळ्या लेखांत काही बेसिकचाच लोचा आहे. आपली लोकशाही अरबांच्या राजेशाहीहून वेगळी नाही. महाराष्ट्र सदन आणि संस्कृतीचा काही संबंधच नाही. लोककल्याणकारी योजनांमुळेच लोकांचं नुकसान होतं, अशी अनेक उटपटांग गणितं ते मांडतात. अर्थात या वाट्टेल त्या लेखांची अडचण अशी आहे की सहजासहजी त्यात तार्किक चुका काढता येत नाहीत. लेख वाचताना 'कशाहीबद्दल' वाटत राहीले, तरी मूलतः ते कशाबद्दल आहेत, ते हुशार वाचकाला समजतंच.

शेवडेंची स्वतःची अशी एक खास लिखाणशैली आहे. 'सिझन्ड' कार्यकर्तीला संघटनाखोर किंवा सेल्फी उत्सुक माणसाला फोटारडा असे मस्त शब्द या शैलीत येतात. अत्यंत निरागस भाबडेपणी प्रश्न विचारत त्यांच्या लेखातील 'मी' समोरच्याची दुतोंडी सत्य उघडी पाडतो. मी मूर्ख, अज्ञ, अपुरा, तोकडा असा सतत धोशा लावून इतरांशी होणारे संवाद जेव्हा ते सांगतात, तेव्हा ही सगळी विशेषणं नक्की कोणाला लागू आहेत, हे आपल्याला जाणवत राहातं. पेपरातल्या लेखांना आवश्यक चुरचुरीतपणा त्यांच्याकडे उदंड आहे.

पण हा सगळा नर्मविनोदी, कुरकुरीत प्रकार म्हणजे निव्वळ थिल्लरपणा समजणं उथळ ठरेल. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत, पूजनीय मानलेल्या 'सामान्य नागरिकांच्या' टोप्या उडवीत, प्रत्येक विषयाला एक तिरकस अँगल देत लोकेश जे मांडतात ते गंभीर आहे. राजकारणी, प्रशासक, उद्योजक, असं सतत दुसऱ्या कोणाच्या तरी माथ्यावर ठप्पा मारणाऱ्या तुम्हाआम्हाला लोकेश स्वतःच्या चुका दाखवून देतात. या सर्वांविषयी, त्यांच्या सत्य अगर कथित पापांविषयी उदंड लिहिलं गेलेलं आहे. पण त्यांच्याकडे एक बोट करून बसलेल्या सामान्य माणसाची चार बोटं त्याच्या स्वतःच्या घशात घालायचं काम लोकेश उत्तम करतात. हे वाचताना सारखं असं जाणवतं की आपल्या आजुबाजूच्या समाजाच्या अतार्किक वागण्याने लोकेशचं काहीतरी जळतं आहे. विदूषकाचा आविर्भाव आणून भलेही ते वाकुल्या दाखवत असतील, पण त्याच्याआड त्यांची सल आहे. भलतीच गृहितकं पकडून ठेऊन समाज चुकीच्या दिशेला जातोय, याचं ते दुःख आहे. म्हणूनच पुस्तकाच्या शेवटाला त्यांचे जे गंभीर लेख येतात, ते त्यांच्या थिल्लरपणा मागचा सखोल अभ्यास दाखवणारे आहेत. साम्यवाद किंवा आज ज्याचं लोकांना आकर्षण वाटतं अशी एक व्यक्ती/पक्षाची हुकूमशाही, याचं ते विस्तृत विश्लेषण करतात. एखाद्या अतिरेकी तत्त्वज्ञानाच्या मागे वाहवत जाण्याच्या सामान्य माणसाच्या प्रवृत्तीवर ते खिन्नही होतात.

लोकांना भले प्रिय वाटणार नाही, पण मला नैतिक वाटेल ती भूमिकाच मी घेणार, हे महात्मा गांधींच्या आयुष्याचं तत्त्व होतं. आपल्या एका लेखात शेवडेंनी त्यावर लिहिलेलं आहे. या पुस्तकाचाही खरंतर तोच धागा आहे. हसत खेळत, चेष्टा करत तुम्हाआम्हाला ऐकायचं नाही,अश्या बऱ्याच गोष्टी या पुस्तकातून आपल्याला ऐकायला मिळतील, त्या ऐकायची तयारी असल्यास हे पुस्तक जरूर वाचावं !!

**अजित जोशी**
९८६९४२४४७९




# शरद पटवर्धन यांना रामभाऊ बर्वे समाजसेवा पुरस्कार

स्वातंत्र्यवीर सावरकर सेवा केंद्रातर्फे २६ फेब्रुवारी, २०२२ या सावरकर आत्मार्पण दिनाचे औचित्य साधून दरवर्षी स्व. रामभाऊ बर्वे समाजसेवा पुरस्कार दिला जातो. २६ जानेवारीला होणारा हा पुरस्कार सोहळाही यंदा करोना महामारीमुळे लांबला. परंतु नियमांमध्ये शिथिलता आल्याने सदर कार्यक्रम या आत्मार्पण दिनाचे औचित्य साधून संपन्न करण्यात आला. हा पुरस्कार प्राप्त होणारी व्यक्ति म्हणजे श्री. शरद रामकृष्ण पटवर्धन पार्ल्यातील एक परिचित नाव. विशेष म्हणजे या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्री. पांडुरंग हरी वैद्यांसारखी अनोखी व्यक्ति लाभली होती.

कार्यक्रमास प्रारंभ डॉ. किशुताई पाल सारख्या नृत्यनिपुण भरतनाट्य नर्तिका व प्रख्यात नृतदिग्दर्शक सुबल सरकार यांच्या कन्या, यांच्या सर्वांगिण नृत्याभिनयाने झाली. त्यांनी त्यांच्या देहबोलीतून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मनातील स्वतंत्रता देवी भगवतीस मूर्तीमंत प्रदर्शित केले आणि त्यासाठी निवडले होते सावरकरांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले काव्य 'जयोस्तुते श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे'. दुसरे काव्य डॉ. किशुताईच्या नृत्यवर्गातील विद्यार्थिनींनी सादर केले तेही स्वातंत्र्यवीराचेच.

'हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजी राजा' डॉ. किशुताईच्या शिवप्रभुंचा महिमा सांगणारे हे गीतही विद्यार्थिनींनी सादर करून स्वातंत्र्यवीर सावरकरांना मानवंदना दिली.



यानंतरचा सोहळा होता स्व. रामभाऊ बर्वे समाजसेवा पुरस्कार प्रदान सोहळा. याच्या सुरुवातीस सावरकर सेवा केंद्राचे कार्यवाह श्री. केशव परांजपे यांनी आपल्या खुमासदार शैलीत त्यांच्या प्राचार्याची म्हणजेच आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. पांडुरंग हरी वैद्यांची ओळख करून दिली. नंतर अध्यक्षांच्या हस्ते नृत्यकर्त्या विद्यार्थिनींचा कौतुक सोहळा पार पडला. त्यांना फळाची परडी तथा प्रशस्तिपत्रके देऊन गौरविण्यात आले.

प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरुवात श्री. शरद पटवर्धन यांना स्वातंत्र्यवीर प्रदान केल्या जाणाऱ्या सन्मानपत्राच्या वाचनाने झाली. ही धुरा स्वातंत्रवीर सावरकर सेवा केंद्र सांस्कृतिक मंडळाच्या प्रमुख, श्रीमती मेधाताई शेटे यांनी सांभाळली आणि सन्मानाचा क्षण आला. आजचे अध्यक्ष श्री. पां.ह. वैद्य यांच्या हस्ते उत्सवमूर्ती श्री. शरद पटवर्धनांचा सन्मान; त्यांना स्व. रामभाऊ बर्वे समाजसेवा पुरस्कार २०२२ या पुरस्काराने गौरविले गेले. या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, मानपत्र, दासबोधाची प्रत तथा रु.१०,०००/- चा धनादेश असे होते. समस्त सावरकर प्रेमी मंडळी व शरद पटवर्धनांच्या चाहत्यांनी सावरकर पटांगण भरून गेले होते. टाळ्यांच्या प्रचंड गजरात हा सुवर्णक्षण अनेकांच्या मनात ठसला असेलच.

शरद पटवर्धनांनी आपल्या मनोगतात आपल्या विशेष दोन कार्याबद्दल माहिती दिली ती म्हणजे अंधेरी स्मशानभूमीतील शवदाहिनी प्रकल्प तथा त्यांच्या कल्पनेतून साकारलेल्या अन् प्रचंड यशस्वी झालेला वॉकेथॉन प्रकल्प. चालण्याच्या साध्या व्यायामासाठी सुरु झालेल्या या कार्यक्रमाला पार्लेकरांनी प्रचंड साथ दिली.

यानंतर सावरकर केंद्राचे कार्याध्यक्ष श्री. सुभाष पेठे यांनी आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीत आजचे प्रमुख वक्ते श्री. अक्षय जोग यांची ओळख करून दिली. इंजिनियरींगचा व्यवसाय असून देखील ओळख करून देतानाच त्यांचा जोश एखाद्या प्रख्यात वक्त्यालाही लाजवेल असाच होता.

नंतर प्रमुख वक्त्यांच्या व्याख्यानास सुरुवात झाली. त्यांचा विषय होता स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची हिंदुत्वाची संकल्पना! त्यांनी आपल्या व्याख्यानातून हिंदु म्हणजे कोण? व हिंदुत्व म्हणजे काय ? याचा सावरकरांचा दृष्टीकोन उलगडून दाखविला. त्याचबरोबर सावरकर आणि त्यांचे विरोधक हा वैचारिक संघर्षही उत्कृष्टपणे मांडला. हे करत असताना सावरकरांची उज्वल प्रतिभा समस्त श्रोतृवर्गापर्यंत पोचविण्याचे कसबही साधले. श्रोत्यांनीही टाळ्यांच्या कडकडाटात या भाषणास मनापासून दाद दिली.

यानंतर अध्यक्ष श्री. पांडुरंग वैद्यांच्या समारोपाच्या भाषणास सुरुवात झाली. कायम हसतमुख असणारी व्यक्ति आहे. त्यांच्या भाषणात स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न मिळवून देण्यासाठी त्यांच्या स्वत:कडून केल्या गेलेल्या प्रयत्नांचा त्यांनी उल्लेख केला व अखेर असंख्य सावरकर चाहत्यांना घेऊन मार्सेलिसला जाऊन कपाळाला लावलेल्या मातीचा प्रसंग त्यांनी सांगितला. खरोखरीच इथे असणारा प्रत्येक श्रोताही तो मनाने हा प्रसंग अनुभवण्यात मशगुल झाला असावा असा क्षणभर आभास निर्माण झाला. त्यानंतर त्यांनी सावरकर केंद्राला स्वातंत्र्यवीरांवर श्री. जोग सरांसारख्या मातब्बर व्यक्तिची संभाषण शिबिरे भरविण्याची सूचना केली. ज्यायोगे तेच काय, पण इतरही अनेक सावरकर प्रेमी मंडळींच्या मनातील प्रश्नांना योग्य उत्तर मिळतील व त्यायोगे सावरकरवादी विचारांचा प्रसार होण्यास चांगलाचं हातभार लागेल. श्रोत्यांनीही त्यांच्या या समारोपी भाषणास उभे राहून दाद दिली.

त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर केंद्राच्या क्रिडाविभाग प्रमुख श्रीमती लिनाताईंनी हसत-हसत सगळ्यांचे आभार मानले. ऋण व्यक्त केले व एका छान रंगलेल्या समारंभाची यशस्वी सांगता झाली.





ज्योतिशास्त्र, वास्तूशास्त्र आणि विज्ञान
यांच एक पांपरिक अभ्यास

गुरूजी
श्री. शुभम शास्त्री
ज्योतिशपांडित, वास्तुतज्ञ व आध्यत्मिक काय
(गंगापूर, कर्नाटक)

कुंडली परीक्षण, वास्तू परीक्षण, वास्तूला तोडफोड व इजा न करता वास्तूसल्ला वधू-वर कुंडली मिलन व त्या प्रमाणे योग्य मार्गदर्शन, मुलांसाठी करिअर गुईडन्स नौकरी व व्यवसाय या बदल योग्य मार्गदर्शन कुंडली प्रमाणे योग्य भाग्य रत्न सल्ला

सर्व पूजा विधी कार्य पारंपारिक व शास्त्रज्ञा पदतीनी केलेल्या जातात


मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे



जन्म कुंडली बनवून मिळेल

अपॉइंटमेंट साठी संपर्क
८३६९२०२८२० / ९८१९२१०९९५

# टाऊन हॉल - एशियाटिक लायब्ररी



वास्तु वैभव

ब्रिटिशांनी मुंबईची स्वत:च्याच सोयीनुसार व आवडीनुसार जेव्हा पुर्नबांधणी सुरू केली तेव्हा ब्रिटिशांच्या संस्कृतीनुसार बांधलेली महत्त्वाची वास्तू म्हणजे टाऊन हॉल. १८३३ साली ही वास्तू बांधून पूर्ण झाल्यापासून ती मुंबईच्या सभ्यतेचे प्रमुख केंद्र बनली आहे. महत्त्वाचे राजकीय व सामाजिक प्रश्न इथेच चर्चिले जात. तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित केले जात.

टाऊन हॉलची रचना आपण बघतो तेव्हा पहिल्यांदाच नजरेत येतां प्रमुख प्रवेशद्वारासमोरील तीस प्रशस्त व प्रदीर्घ पायऱ्या. पायऱ्या चढू लागण्यापूर्वी पहिल्याच पायरीवर चौकोनी शीला बसवलेली आहे. त्यावर '0' कोरलेला आहे. मुंबई शहराची 0 पातळी म्हणजेच समुद्रसपाटीची पातळी दाखवण्याची ती अधिकृत खूण आहे. तिला टॅडम किंवा बेंच मार्क म्हणतात. टाऊन हॉलच्या पायऱ्या चढू लागलो की घडीव लोखंडाचे दोन्ही बाजूंचे कठडे दिसतात. आज काळाच्या ओघात त्यांची दुर्दशा झाली आहे. संध्याकाळी या पायऱ्यांवर अनेक विद्यार्थी अभ्यास करताना दिसतात. रात्रीही तिथल्या दिव्यांच्या प्रकाशात त्यांचा अभ्यास सुरू असतो. तेथून वर पाहिले की ब्रिटिश साम्राज्याच्या सामर्थ्याचे प्रतीक असेच जणू अशी वास्तू सामोरी येते. दोनशे फूट लांब व शंभर फूट रुंद अशा प्रासादतुल्य इमारतीचा दर्शनी भाग तीन व्हरांडेवजा मंडपात विभागला आहे. जुन्या 'दोरिक' आणि ग्रीक शैलीतील आठ स्तंभ नजर खिळवून ठेवतात. इथली दारे खिडक्या सागवानी लाकडाची असून पश्चिमाभिमुख आहेत. त्यांच्या वारा, ऊन, पाऊस यांचे नियंत्रण करण्यासाठी वर-खाली होणाऱ्या झडपा व त्यावरील घुमटाची संरक्षण टोपी इमारतीचे सौंदर्य वाढवतात.

टाऊन हॉलच्या प्रशस्त सभागृहात आपण शिरलो की दर्शन होते देखण्या छताचे. कॉरीनथियन या पुरातन ग्रीक शैलीतील स्तंभांनी ते तोललेले आहे. इथे डाव्या बाजूला लॉर्ड माउंट एलफिस्टन यांचा संगमरवरी पुतळा आहे. ते १८१९-२७ या काळात मुंबईचे गव्हर्नर होते. त्यांच्याच नावाने एलफिस्टन कॉलेज उभारलेले आहे. दुसरा चार्ल्स फोर्ब्स या एकोणिसाव्या शतकातील प्रतिथयश अर्थकारण्याचाही पुतळा इथे आहे. दक्षिण बाजूला सभागृहाहून लहान पण रेखीव व प्रमाणबद्ध दरबार हॉल आहे. येथे विविध ज्ञानशाखांतील मान्यवर विद्वानांची व्याख्याने एशियाटिक सोसायटीतर्फे नियमितपणे आयोजित केली जातात. दरबार हॉलमध्ये अत्युत्कृष्ट रंग प्रतिमा (पोर्ट्रेट्स) लावलेली आहेत.

उत्तरेकडील प्रशस्त दालनात आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शिल्पकारांनी बनवलेली मनोहारी शिल्पे दिसतात. यात जॉन माल्कम या इतिहासकार लढवय्याचा पूर्णाकृती पुतळा तसेच मुंबईचे दानशूर शिक्षणप्रेमी सर जगन्नाथ शंकर शेठ यांचा आसनस्थ पुतळाही आहे; जो गोलाकार जिन्याच्या पायथ्याशी ठेवलेला आहे. तसेच एकेकाळचे मुंबईचे गव्हर्नर व आधुनिक मुंबईचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे सर बार्टल फ्रियर यांचाही पुतळा आहे. नंतर पहिले बारोनेट सर जमशेदजी जीजीभॉय यांचा आसनस्थ व प्रख्यात संस्कृत पंडित व भारतरत्न श्री. पां. वा. काणे यांचा ब्राँस धातूतील अर्धपुतळा नुकताच तेथे बसवला आहे.

तिथले वाचनालय टाऊन हॉलच्या उत्तरेकडील दालनात असून इथे दुर्मिळ हस्तलिखिते आणि नाना विषयांवरील हजारो प्राचीन, अर्वाचिन ग्रंथांचे मोठे भांडार आहे. अतिशय सुबक पण मजबूत बांधणीची सागवानी लाकडाची मोठी शेल्फ, पायाखालची मोहक फरसबंदी इथल्या नीरव शांततेला रमणीय स्वरूप बहाल करतात. घडीव लोखंडाचे नक्षीदार कठडे असलेले सज्जे व गोलाकार सुडौल जिने इथल्या सौंदर्यात आणखीन भर घालतात.

पण आपले दुर्दैव म्हणजे या टाऊन हॉल इमारतीकडे शासनकर्त्यांकडून पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. योजनाबद्ध कार्यक्रम आखून विचारपूर्वक या इमारतीचे सौंदर्य व महत्त्व जपण्याची गरज आहे.


संगीता बेहेरे
९८६७७५८३१०

## विलेपार्ले विभागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मोफत उपलब्ध होणार

पार्ल्यातील महात्मा गांधी रोड येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाची नवीन इमारत तयार झाली असून येथे आंतरराष्ट्रीय बोर्डाची शाळा सुरू करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मोफत मिळावे अशी मागणी युवासेना सचिव वरुण सरदेसाई यांच्याकडून करण्यात आली होती. या मागणीची पर्यावरण मंत्री व युवासेनाप्रमुख श्री. आदित्य ठाकरे व बृहन्मुंबई महानगरपालिकेने योग्य दखल घेतल्याचे दिसत आहे.

SANKALP TOURS & TRAVELS
An Unique Experience
SUNIL TARKAR
7738121381
UPCOMING TOURS
VAISHNODEVI KASHMIR (8N) 31MAR, 19MAY
KASHMIR BY AIR (5N) 14APR (6N), 22 MAY (5N)
SHIMLA-MANALI/HIMACHAL (6N)/ (9N) 23APR 31MAY
LEH LADAKH (7N)- 22MAY, 5JUN, 3JUL, 9AUG
CHARDHAM (12N)- 18MAY, 15JUN, 10SEP, 6OCT
KONKAN-TARKARLI-GANPATIPULE (3N) 5D- 21MAR
STATUE OF UNITY VADODARA 1N 2D - 11MAR
INTERNATIONAL TOURS
AUSTRIA-PARIS -SWISS 7N
ICELAND 7N
PRAGUE-BUDAPEST- VIENNA 6N
AMAZING NORWAY
LONDON-SCOTLAND 6N
BALTIC EUROPE 6N / KENYA SAFARI 5N
SANKALP Special CUSTOMISED TOURS
Destination - Your Choice . . . Your Family - Your Freedom. . .
Your Own Program - Your Budget . . .
Expertly Planned Program - Quality Hotels & Services . . .
Plan Your HOLIDAYS with SANKALP~TRAVEL WITH SANKALP
& Have a "UNIQUE EXPERIENCE"

# दि पाठारे क्षत्रियाज् ऑफ बॉम्बे- संदीप दहिसरकर




मुंबईच्या इतिहासावर आजवर अनेक माहितीपर पुस्तके मराठी, इंग्लिश इ. भाषांमध्ये लिहिली गेली आहेत. दिग्गज पुरातत्व व इतिहास संशोधक व अभ्यासकांनी आपापल्या परीने नव्याने काही शोध लावले आणि ते मुंबईच्या इतिहासात भर घालत गेले. तरूण इतिहास अभ्यासक व पार्लेकर श्री. संदीप दहिसरकर यांचे असेच एक नवे इंग्लिश पुस्तक 'दि पाठारे क्षत्रियाज् ऑफ बॉम्बे' गेल्या महिन्यात एशियाटिक सोसायटीच्या दरबार हॉलमध्ये महाराष्ट्र राज्य शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्या हस्ते प्रकाशित झाले. पुस्तक प्रकाशनानंतर शिलाहार हेरिटेज सर्विसेस तर्फे बासरीवादक एस. आकाश व तबलावादक इशान घोष यांचा सुश्राव्य शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समीरा गुजर-जोशी यांनी केले. या दरम्यान पं. नयन घोष, दिग्दर्शक परेश मोकाशी, युवराज माधवराव पटवर्धन (मिरज), श्रीम. विस्पी बॅलपोरिया, वृंदा पाठारे, प्रा. संतोष पाठारे



उपस्थित होते.

दहिसरकर यांना २०१७ मध्ये मिळालेल्या एशियाटिक सोसायटीच्या गुलेस्तान बिलीमोरिया ज्युनियर रिसर्च फेलोशिपचा विषय पाठारे क्षत्रिय (पाचकळशी) समाजाचा सांस्कृतिक इतिहास असा होता. १२व्या शतकात चंपानेरहून प्रताप बिंब (बिंब राजा) बरोबर ६६ कुळे पैठण मार्गे मुंबईत स्थलांतरित झाली होती. या पुस्तकाच्या माध्यमातून लेखकाने ६६ पैकी २२ पाठारे क्षत्रिय, ३ पाठारे प्रभू व ४ सुर्यवंशी कुळांचा त्यांच्या आडनावासकट शोध लावला असून मुंबईतील मध्ययुगीन व इतिहासात नोंद असलेल्या या ज्ञातींचे एकत्रित स्थलांतर, बिंब राजा, महिकावतीची बखर, वसईची मोहिम (१७३७-३९), या समाजातील काही महत्वाच्या घराण्यांचे वंशवृक्ष, जात पंचायत, त्यांचे लग्न समारंभ, मृत्युविधी, मंदिरे व सामाजिक संस्था, ५४ थोर व्यक्तिमत्त्वे, स्वातंत्र्य सैनिक इ. विषयांवरील सविस्तर शास्त्रीय ज्ञातीय इतिहास लेखन व त्याचा आपल्या शहराच्या मध्ययुगीन व स्वातंत्र्यपूर्व काळाशी असलेला जुना ऋणानुबंध मराठी पुरावे व साहित्याच्या अभ्यासातून मांडला आहे. या पुस्तकाद्वारे विस्मृतीत गेलेल्या मराठी माणसांचे मुंबई शहर घडविण्यात सांस्कृतिक व बौद्धिक योगदान वाचकांसमोर प्रथमच येत आहे.

प्रकाशक- सहित प्रकाशन, गोवा

पुस्तकाचे मूल्य- रू. १,०००/-

पृष्ठ संख्या- ३२५ (१४७ रंगीत छायाचित्रे)

# बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स

बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, BITS पिलानी ही उच्च शिक्षणासाठी (known as private IIT ) रेप्युटेड भारतीय संस्था आहे. BITS राजस्थानमधील पिलानी शहराला लागून असलेल्या विद्याविहार कॅम्पसमध्ये आहे. BITS चा प्राथमिक हेतू 'कल्पना, पद्धती, तंत्र आणि माहिती तयार करण्यास तसेच कृती करण्यास उत्सुक असलेल्या मुलांना आणि मुलींना प्रशिक्षित करणे' हा आहे. अशी संस्था बनवणे हे तिचे संस्थापक दिवंगत जी.डी. बिर्ला (प्रख्यात उद्योगपती आणि महात्मा गांधींचे निकटचे सहकारी) यांचे स्वप्न होते. १९०० च्या दशकाच्या सुरुवातीस हे स्वप्न एका लहान शाळेच्या स्वरूपात सुरू झाले आणि लवकरच उच्च शिक्षणासाठी अनेक महाविद्यालयांमध्ये रूपांतरित झाले. १९६४ मध्ये ही सर्व महाविद्यालये एकत्र होऊन एक अद्वितीय भारतीय आंतरराष्ट्रीय विद्यापीठ बनले. या विद्यापीठाचे नामकरण बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, पिलानी असे करण्यात आले, जे BITS, पिलानी म्हणून ओळखले जाते.

BITS हे भारतीय तांत्रिक क्षमतेच्या परिपक्वतेचे आणि 'मी करू शकतो (I can do it)' या उद्योजकतेचे /भूमिकेचे प्रतीक आहे. गेल्या अनेक वर्षात, BITS ने भारतातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे तांत्रिक शिक्षण दिले आहे. BITS चे पदवीधर, अभियांत्रिकी (Engineering), विज्ञान आणि वाणिज्य या क्षेत्रात सर्व जगभरात आढळतात.

**BITS मध्ये प्रवेश कसा मिळवायचा ?**

BITS मध्ये प्रवेश गुणवत्तेवर केले जातात. यासाठी BITSAT ही परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा online पद्धतीने घेतली जाते. Physics, Chemistry, Mathematics, English आणि तर्क ( logic and reasoning) यावर अनुक्रमे ४०, ४०, ४५, १५ आणि १० वस्तुनिष्ठ प्रश्न असतात. प्रत्येक प्रश्न ३ गुणांचा असून चुकीच्या उत्तराना प्रत्येकी १ गुण कापला जातो.

यंदा ही परीक्षा जून २०२२ मध्ये होणार आहे. या परीक्षेत मिळणारे गुण विद्यार्थ्याला लगेच कळतात. मात्र ही परीक्षा अनेक टप्पात घेतली गेल्यामुळे मेरीट क्रमांक काही दिवसांनी जाहीर होतो .

मेरिट क्रमांक हा उमेदवाराने BITSAT-२०२२ मध्ये मिळवलेल्या गुणांवर असेल.

सर्व इंजिनीअरिंग प्रथम-पदवी कार्यक्रमांच्या प्रवेशासाठी उमेदवारांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणितासह मान्यताप्राप्त केंद्रीय किंवा राज्य मंडळातून १०+२ प्रणालीची १२वी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यांना इंग्रजीचे पुरेसे ज्ञान असावे.

विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, आणि गणित/जीवशास्त्र या प्रत्येक विषयात किमान ६०% गुणांसह वर नमूद केलेल्या विषयांमध्ये एकूण किमान ७५% गुण प्राप्त केलेले असावेत, जे विद्यार्थी २०२२ मध्ये 12वीची परीक्षा देत आहेत किंवा ज्यांनी २०२१ मध्ये 12वीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे तेच BITSAT-२०२२ परीक्षेला बसण्यास पात्र आहेत. तथापि, प्रवेशासाठी त्यांची पात्रता बारावी परीक्षेत किमान गुणांची आवश्यकता पूर्ण करणे बंधनकारक आहे. जर बारावीच्या परीक्षेचा निकाल BITSमध्ये अर्ज सादर करण्याच्या विहित तारखेमध्ये उपलब्ध नसेल, तर उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही.

(अधिक माहिती www.bits pilni.ac.in किंवा Dr. U. R Kapdi 9867244891 (Golden Gate to IIT) यांना संपर्क करावा

**प्रा. विनायक अंतरकर**
९८२०६५१०६८






# महामहिम मंडळींचा महंत मार्ग !

नमस्कार पार्लेकर्स.

पार्ले नगर ! त्वामभिवंदे सादरं, शिरसि मे तव धूलिम्।

धारये शुचिकरां स्मृतिगंधाम् स्पर्शने पुलकितो मम देह:।।

एखाद्या गावाची अशी संस्कृतमध्ये ग्रामस्तुती लिहिलेली आपण किती ठिकाणी पाहिली आहे ? आपल्या पार्ल्याचे पोवाडे गाणारी एक सुंदर आणि अर्थपूर्ण संस्कृत कविता कवी ल. वि. देशपांडे यांनी लिहून ठेवली आहे बरं का ! समस्त पार्लेकरांना अभिमान वाटावा अशी ही गोष्ट ! पार्ले नगरीचे महात्म्य वर्णन करणारे हे संपूर्ण पार्ले स्तोत्र जर कुणाला हवे असेल तर त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा !

तर मंडळी, जसं शरीर म्हटलं की रक्तवाहिन्या आल्या, तसं गाव, नगर म्हटलं की आडवे, उभे, तिरवे, सरळ किंवा वळणावळणाचे रस्ते आले. पार्ल्यामधील रस्त्यांची माहिती आणि थोडाबहुत इतिहास माहीत करून घेण्याच्या उद्देशाने आपण गेल्या दोन महिन्यापासून हा लेखन उद्यम आरंभला आहे. हनुमान मार्ग, नेहरू मार्ग यांवर लिहिल्यानंतर आता आपण महंत मार्गाची माहिती घेऊ या.


बऱ्याच लोकांना हा प्रश्न असतो की महंत मार्गाच्या नावाची व्युत्पत्ती काय आहे ? इतिहास काय आहे ? या मार्गावर खरेच कोणी संत महंत राहत होते किंवा कसे ?

तर त्याची कथा अशी आहे की, विलेपार्ल्याच्या अत्यंत आरंभीच्या काळात जे काही अनेक सेवाभावी लोक येथे राहावयास आले, त्यामध्ये मुंबईजवळील घारापुरी (एलिफंटा) बेटावर जन्मलेले श्री. बापूजी महादेव महंत तथा पडते यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. श्री. बापूजी महंत निवृत्तीनंतर पार्ल्यामध्ये राहावयास आले. मिलिटरी फायनान्स ऑफिसमध्ये नोकरी करणारे बापूजी आधी मुंबई आणि नंतर पुणे येथे कामास होते. निवृत्तीनंतर पुण्याचे हवामान त्यांना न मानवल्यामुळे ते १९१५ साली मुंबईला आले आणि त्या काळी 'हवेच्या दृष्टीने चांगले' असा




लौकिक असलेल्या पार्ल्यामध्ये एक सुंदर बंगला बांधून राहू लागले.

बापूजींनी निवृत्तीनंतर होमिओपथीचा अभ्यास केला होता. त्याचा उपयोग ते लोकसेवेसाठी करायचे. त्याकाळी पार्ल्यामध्ये विलेपार्ले रेसिडेंट्स असोसिएशन या नावाची एक संस्था होती. या संस्थेचे बापूजी प्रथमपासूनच सेक्रेटरी झाले आणि हे काम त्यांनी विनामोबदला



जवळजवळ दहा वर्षे केले. श्री. बापूजी महंत यांची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी विलेपार्ले गावामध्ये, सरकार दरबारी प्रयत्न करून पोस्ट आणि तार ऑफिस स्थापन करून घेतले.

त्यांचा बंगला त्यांनी ज्या मार्गावर बांधला त्या मार्गाला मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महंत मार्ग असे नाव दिले. तोच हा आपला महंत मार्ग !

तर मंडळी, ही झाली महंत मार्गाच्या नावाच्या व्युत्पत्तीची कहाणी ! परंतु महंत मार्ग अस्तित्वात कसा आला याची कहाणी सुद्धा सुरस आहे ! अर्वाचीन हिंदुस्थानी शिल्पकारांचे स्फूर्तीदाते म्हणून ज्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते, ते सर्वश्रेष्ठ शिल्पकार श्री. गणपतराव काशिनाथ म्हात्रे यांनी आपला पुतळे ओतण्याचा कारखाना गिरगावमधील मांगल वाडीमधून पार्ल्यामध्ये हलवला होता. शिल्पकार म्हणून गणपतरावांचे नाव इतके मोठे झाले होते की त्यावेळी मुंबईचे गव्हर्नर गणपतरावांचा हा स्टुडिओ खास पाहण्याकरता विलेपार्ले येथे येणार होते. परंतु त्यावेळी स्टुडिओपर्यंत जाण्यास चांगला रस्ता नव्हता. त्यामुळे खास गव्हर्नर साहेबांसाठी घाईघाईने महात्मा गांधी मार्गापासून एक रस्ता तयार करण्यात आला. तोच हा महंत मार्ग !

पुण्यामध्ये जन्मलेले गणपतराव पुढे



मुंबईमध्ये आले आणि त्यांची अंगभूत शिल्पकला आणखी उजळून निघाली. जे जे स्कूलमध्ये शिक्षण घेतल्यानंतर त्यांच्यामधील कलेचे आगळेपण दृष्टीस पडू लागले. त्यांचे कौशल्य पाहून जेजे स्कूल ऑफ आर्ट्सचे तत्कालीन प्रिन्सिपॉल एकदा म्हणाले की, गणपतरावांनी शिकण्याकरता नसून शिकवण्याकरता महाविद्यालयात यावे !! जेजे स्कूल ऑफ आर्ट्सच्या प्रवेशद्वारातील पूजासाहित्य हातात घेऊन निघालेल्या भारतीय रमणीची अत्यंत विलोभनीय अशी मंदिरपथगामिनी (To the Temple) ही गणपतरावांची कलाकृती तर शिल्पकलेच्या क्षेत्रातील अनन्यसाधारण दंतकथा बनून राहिली आहे ! शबरी, आर्ट नीडल वर्क, बैरागी, आफ्टर बाथ आणि अशा, गणपतरावांच्या अनेक कलाकृती अजरामर झाल्या आहेत. ब्राँझचे पुतळे हिंदुस्थानमध्ये बनवण्याचे कार्य गणपतरावांनीच प्रथम सुरू केले.

तर असा हा, महात्मा गांधी मार्गापासून प्रारंभ होऊन ९० अंशांमध्ये पूर्व दिशेला जाणारा महंत मार्ग बऱ्याच वर्षांपूर्वीपर्यंत प्रार्थना समाज मार्गापर्यंत येऊन संपत होता. नंतर पुढे जशी वस्ती वाढली तसा हा मार्ग, प्रार्थना समाज मार्गाला छेदून पुढे उत्कर्ष मंडळाच्या चौकापर्यंत वाढवला गेला. मार्गाच्या या टप्प्याला महंत मार्ग-विस्तारित असे नाव आहे. महात्मा गांधी मार्गापासून महंत मार्गावर आपण निघालो की थोड्याच अंतरावर, डाव्या बाजूला



ब्रिजमोहनलाल लक्ष्मीनारायण रुइया हायस्कूल आहे. १९५३ साली स्थापन झालेल्या या हायस्कूलचे, मुंबईतील हिंदी माध्यमाच्या हायस्कूल वर्तुळामध्ये मोठे नाव आहे.

तसेच आणखी पुढे आले की एक चौक लागतो. डाव्या बाजूचा रस्ता हनुमान मार्गास जाऊन मिळतो आणि उजव्या बाजूचा रस्ता प्रार्थना समाज मार्गास जाऊन मिळतो. या चौकास वीरचंद शेठ असे नाव आहे. एका प्रखर राष्ट्रवादी आणि समाजवादी व्यक्तीचे हे नाव आहे. मूळचे सौराष्ट्रमधील असलेले वीरचंद शेठ अनेक चळवळीमध्ये आणि आंदोलनामध्ये सहभागी होते. सौराष्ट्रमधील पीपल काँग्रेस सत्याग्रह असो किंवा तेथील राजेशाहीच्या दडपशाहीला तोंड फोडण्याचे आंदोलन असो, प्रत्येक गोष्टीमध्ये वीरचंद शेठ सहभागी असायचे. डेली संघ, जन्मभूमी अशा प्रकारच्या दैनिकांमध्येसुद्धा त्यांनी काम केले. शालेय शिक्षण अत्यल्प असले तरी प्रत्येक तुरुंगवासांमध्ये ते काही ना काही शिक्षण घेत गेले आणि त्याचा उपयोग त्यांनी समाजकार्य आणि देशकार्याला करीत गेले. वीरचंद शेठ यांचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे जुनागड संस्थान हिंदुस्थानमध्ये विलीन करण्यामध्ये त्यांचा असलेला सहयोग ! जुनागडचे नबाब पाकिस्तानात सामील होणार अशी कुणकुण होती. वीरचंद शेठ यांचा सत्याग्रहावर जरी विश्वास असला तरी असे किचकट प्रश्न सत्याग्रह आणि अहिंसेने सुटणार नाहीत अशी त्यांची ठाम श्रद्धा होती. हा प्रश्न



केवळ जुनागडच्या प्रजेने सशस्त्र आंदोलन केले तरच सुटू शकेल अशी भूमिका त्यांनी मांडली. काठेवाड प्रजा परिषदेमार्फत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मदतीने जो सशस्त्र उठाव करण्यात आला, त्यामध्ये वीरचंद शेठ आघाडीवर होते. पार्लेकरांनी केवळ साहित्य, संस्कृती, कला एवढेच आपले कार्यक्षेत्र मर्यादित ठेवले नव्हते तर सशस्त्र आंदोलनातसुद्धा वेळप्रसंगी सहभाग घेतला याचे हे ज्वलंत उदाहरण !

पार्ल्याच्या इतिहासामधील एक, अध्यात्मिक वृत्तीची महत्त्वाची व्यक्तीसुद्धा महंत मार्गावर राहत होती. श्री विष्णुपंत घोटीकर !

लोकमान्य सेवा संघाचे अत्यंत प्रारंभिक काळातले कार्यकर्ता असलेले विष्णुपंत उत्तम कीर्तन आणि प्रवचन करीत असत. लोकसेवा संघाच्या कार्यामध्ये स्वयंसेवकापासून ते शाखेच्या कार्यवाहपर्यंत त्यांनी काम केले. साहित्य संघ, ब्राह्मण सभा आदी संस्थामध्येसुद्धा ते सेवा करत असत. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाची स्थापना झाली तेव्हा संघासाठी जागा मिळवण्यापासून ते त्याची इमारत उभी करण्यापर्यंत अनेक गोष्टींमध्ये विष्णू पंतांचे मोठे योगदान होते !

पुढे महंत मार्ग प्रार्थनासमाज रस्त्यापासून उत्कर्ष मंडळापर्यंत विस्तारित करण्यात आला. या मार्गावर गोंयकर मंडळींची गोमंतक सोसायटी आहे. प्रख्यात नाट्य अभिनेते रामदास कामत या सोसायटीमध्ये राहायचे. गोमंतक सोसायटीच्या थोडे पुढे, कृष्णकुंज नावाची एक इमारत आहे. या इमारतीचे वैशिष्ट्य असे की, दोन मोठी मंडळी येथे राहायची. एक म्हणजे लेखक स. ह. देशपांडे आणि दुसरे म्हणजे विलायतेत शिकून आलेल्या हिंदुस्थानमधील दोन पहिल्या टाऊन प्लॅनर्सपैकी एक, श्री. नागेन्द्रनाथ शितुत ! नागेंद्रनाथ हे हिंदुस्थानमधील एक अव्वल दर्जाचे स्थापत्यशास्त्र विशारद होते. अत्यंत गरिबीतून वर येऊन, जे जे स्कूल ऑफ आर्ट्स मधून पदवी धारण केल्यानंतर १९५० च्या दशकात दोनदा इंग्लंडला शिक्षणासाठी जाऊन त्यांनी या शास्त्रातील उच्च शिक्षण घेतले होते. मुंबई महानगरपालिका, सिडको, महाराष्ट्र शासन अशा विविध ठिकाणी पदांवर कार्य करताना त्यांनी पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद, रत्नागिरी, नवी मुंबई, नाशिक अशा विविध शहरांची नगररचना केली होती.

अशा प्रकारे महंत मार्गावर कोणी संत-महंत राहत नसले तरी वरील प्रकारची अनेक महान महंत मंडळी मात्र निश्चितच वास्तव्यास होती ! त्यामुळे हा मार्ग आपले नामाभिधान सार्थ करीत गेली कित्येक वर्षे पार्ल्याच्या इतिहासाचा एक मूक साक्षीदार बनून जवळजवळ शंभर वर्षे वाहतो आहे !

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५

# मार्जार कुळातील मोठे प्राणी (बिगकॅट्स) - सिंह

तीन-चार वर्षांपूर्वी केनियातील मसाईमारा या गवताळ प्रदेशात घडलेली ही घटना. दुपारचे तीन-चार वाजले होते. दोन दिवस केनियातील अंबोसेली भागात मनमुराद भटकून आज सकाळी आम्ही मसाईमाराला आलो होतो. स्थानिक आदिवासी मसाई जमातीच्या भाषेत मसाईमाराचा अर्थ 'अथांग पसरलेला गवताचा सागर' असा आहे. साधारण १६,२५० स्क्वे. किमी. परिसरात पसरलेला गवताळ प्रदेशातील १०% भाग केनियात तर बाकी टांझानिया या देशात विभागलेला आहे. केनियातील भागाला मसाईमारा तर टांझानियात असलेल्या प्रदेशाला सेरेंगेटी म्हणतात. वाईल्ड बिस्ट आणि झेब्रा यांचे ग्रेट मायग्रेशन याच रंगमंचावर घडते. आफ्रिकेत ज्याला बिग फाईव्ह (सिंह, हत्ती, गेंडे, बिबळे आणि केप बफेलो) म्हणतात ते सर्व इथेच पाहायला मिळतात. या व्यतिरिक्त हिप्पो आणि नाईल मगरी हे तितकेच खतरनाक प्राणीसुद्धा इथे



वास्तव्य करून आहेत. सकाळ पासून मैलोन्मैल फिरलो तरीसुद्धा सिंहाचे दर्शन झाले नाही याची चुटपुट बाळगत आमची भटकंती चालू होती.

सफारी मिनी व्हॅनमधून गुडघाभर पसरलेले गवत, त्याच्या अगणित छटा, वाऱ्यामुळे उठणारे तरंग आणि मधून मधून दिसणारी 'सॉसेजट्री' म्हणतात ती झाडे, चरणाऱ्या झेब्र्यांचे, म्हशींचे आणि वाइल्ड बिस्टचे कळप असे दृश्य कितीही आकर्षक असले तरी 'सिम्बा' किंवा सिंह पाहायला आम्ही अधीर झालो होतो. अचानक खूप दूर झाडाखाली काही हालचाल जाणवली. आफ्रिकेत एक बरं असतं. पार्कमध्ये रस्ते नसतातच . तेव्हा अगदी कुठे ही गाडी घेऊन जाता येते. अर्थात योग्य अंतराचा नियम पाळावाच लागतो. जवळ नेल्यावर जे दृश्य पहिले ते आजही मनाच्या एका कोपऱ्यात वर्षानु वर्षे साठवून ठेवले आहे. झाडाखाली असलेल्या,



खुरट्या, काटेरी झुडपांच्या झाडीत सिंहाचे एक कुटंब नुकत्याच मारलेल्या रान म्हशीवर तुटून पडले होते. दोन कुटुंब प्रमुख नरसिंह भर पेट जेवण करून झाडाच्या सावलीत गाढ झोपले होते. दोन-तीन माद्या पण जेवणानंतर पहुडल्या होत्या. पिल्ले मात्र मेलेल्या भक्ष्याशी झटापट करत खात होती. खरं सांगायचं तर आम्ही खूप नशीबवान होतो. शिकार करताना किंवा खाताना सिंह पहायला मिळणं खूपच दुरापास्त आहे.नॅशनल जिओग्राफिक किंवा बीबीसी वरील फिल्म्स पाहायला आपल्याला आवडत असल्या तरी ते शूटिंग करायला फोटोग्राफर्सना कैक वर्ष तळ ठोकून, सिंहांच्या मागावर राहायला लागते. बहुतेक वेळा सिंह रात्री शिकार करत असल्याने त्यावेळी हजर असणे आणि चित्रीकरण करणे अशक्यच.

मार्जार कुळातील इतर प्राण्यांपेक्षा सिंह फार वेगळा आहे. मार्जार कुळातील कुटुंब वत्सल असा एकमेव प्राणी म्हणजे सिंह. एका कुटुंबात एक-दोन नर, आठ दहा माद्या आणि पिलावळ असते. एका सिंहाची हद्द किंवा राज्य साधारणपणे १०० किमी व्यासाची असते. एकाठिकाणी दोन-तीन माद्या त्यांची पिल्ले असतात. माद्या एकमेकांच्या बहिणी बहिणी किंवा आई-मावशी-मुली असतात. अशा प्रकारे माद्या राज्यभर चार-पाच जागी असतात. सिंह त्यांना भेट देत फिरत असतात. पूर्वी नाही का राण्या वेगवेगळ्या ठिकाणी असायच्या? त्यातीलच हा प्रकार.

जन्मत: बछड्यांचे डोळे दोन-तीन महिने बंद असतात. त्या वेळी त्यांची खूप काळजी घ्यावी लागते. तरस आणि बिबळे तसेच इतर सिंह हे त्यांचे शत्रू. माता प्राणपणाने प्रसंगी जीवावर उदार होऊन त्यांचे रक्षण करते. डोळे उघडल्यावर पिले आई बरोबर फिरू लागतात. हळू हळू आई त्यांना सावज कसे शोधावे, पाठलाग कसा करायचा, हल्ला कधी आणि कसा करायचा, प्राण्याची कातडी कशी सोलायची याचा वस्तुपाठ घालून देते.

शिकार बहुदा माद्या करतात. केलेल्या शिकारीतील पहिला वाटा मात्र नरांचा! त्यांचे पोट भरल्यावर ते दूर जाऊन झोपा काढतात. मग माद्या जेवायला सुरुवात करतात. पुराण काळात पतीच्या जेवणानंतर त्याच ताटात बायका जेवायच्या ही प्रथा यावरूनच पडली असेल का? सर्वात शेवटी बच्चू कंपनी जेवायला बसते. मांस समोर दिसले तर बछडे पोट फुटेपर्यंत जेवतात आणि आजारी पडतात. यातच त्यांचा अंत होऊ शकतो. म्हणून निसर्गाने उर्वरित अन्नच त्यांना मिळावे यासाठी ही रचना केली असावी.

आणखी एक आश्चर्यकारक प्रथा सिंहांमध्ये सापडते पिल्लांची आई शिकारीला गेली असता उशीर झाला किंवा ती मरण पावली तर पिल्ले भुकेने कळवळतात. अशा वेळी दुसरी मादी दूध पाजते. त्यांचे पालन पोषण करते. 'माय मरो आणि मावशी जगो' ही म्हण बहुदा या वरून पडली असावी.

तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल पण क्रेग पॅकर सारख्या अनेक संशोधकांनी तीस-पस्तीस वर्षे आफ्रिकेत राहून सिंहांविषयी अभ्यास केल्याने त्यांच्या बद्दल अनेक प्रकारची माहिती उपलब्ध केली आहे. क्रेगने तर जवळ जवळ ५०००च्या वर सिंहांची नोंद करून ठेवली आहे. मनुष्याच्या बोटांच्या ठश्यांवरून जशी त्याची ओळख पटवता येते तशी सिंहांची ओळख त्यांच्या मिशीच्या ठिपक्यावरून पटवतात. प्रत्येक सिंहाच्या मिशीच्या ठिपक्यात फरक असतो.

नर सिंहाचे राज्य साधारण२-३ वर्षाचे असते.



म्हातारपणाकडे झुकलेला सिंह मग तरण्या नर सिंहाच्या किंवा सिंहांच्या जोडीच्या आक्रमणाचा सामना करू शकत नाही. मग त्याला आपले कुटुंब सोडून वनवासात जावे लागते. कुटुंब प्रमुख बदलला तरी माद्या मात्र कुटुंबातच राहतात. यावरून लक्षात येईल की सिंहात मातृसत्ताक पद्धत आहे. जिंकलेला सिंह माद्यांपासून आपला वंश वाढवतो. कळपातील सावत्र बच्चे मारून टाकल्यावर पुत्र-वियोगाचे दु:ख विसरून मादीसंग करायला माजावर येते. जंगलातील सिंहाचे आयुष्य या मुळेच९-१०वर्षे असते. पिंजऱ्यातील सिंह मात्र देखभालीमुळे जवळ-जवळ दुप्पट वर्षे जगतो.

जेव्हा दुष्काळामुळे किंवा उन्हाळ्यामुळे वाइल्डबिस्ट, झेब्रा अशा छोट्या भक्ष्याची कमतरता जाणवते तेव्हा राज्यातील सर्व छोटी छोटी कुटुंबे एकत्र येतात. संख्या बळ वाढल्याने सहकार तत्वावर शिकार करून रान म्हशी, जिराफ अशा मोठ्या प्राण्यांची वेळोवेळी शिकार करून अन्न कमतरतेवर मात करता येते. अशा वेळी नर ही शिकारीत अग्रभागी असतात.

एका संशोधनानुसार पिल्लांचे रक्षण, वंशवृद्धी, वंशसातत्य, सामुदायिक शिकार करण्याचे फायदे, आपल्या हद्दीचे रक्षण या सर्व बाबी लक्षात घेऊन सिंहांनी एकत्र कुटुंब पद्धती अंगिकारली आहे.

सिंहाच्या बाबतीत आपण 'जंगलचा राजा' हे विशेषण लावतो. खरंतर हे चुकीचे वाटते. पाठलाग करून शिकार करत असल्याने सिंहाला घनदाट जंगलाचे वावडे आहे. गवताळ प्रदेश, खुरटी झुडपे, तुरळक झाडे असलेला प्रदेश हा त्याचा अधिवास. त्या मुळे आफ्रिका तसेच भारतातील गीरचा प्रदेश यातच तो आपले अस्तित्व टिकवू शकला आहे. असे असले तरी राजस्थान व मध्य प्रदेशातील काही भागात सिंहांचे पुनर्वसन होऊ शकेल असे अधिवास आहेत. मध्यंतरी काही योजनाही त्या दृष्टीने तयार केल्या होत्या. पण गुजरात सरकारने पर्यटनामुळे मिळणाऱ्या पैशावर डोळा ठेऊन त्या हाणून पडल्या. सिंह संवर्धनासाठी राज्य पातळीवर विचार न करता देश हिताच्या दृष्टीने तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने विचार करणे सांयुक्तिक आहे हे काही लोकांनां कोण समजावणार? मांजराच्या गळ्यांत कोण घंटा बांधणार? प्रश अनुत्तरीतच आहे.....

संजय देवस्थळी
९८३३८६६४६२

सुगम संगीत : भावगीत / भक्तीगीत / अभंग व सिनेगीतांचा
गायन क्लास
कलांजली

- "कलांजली" या संस्थेतर्फे मराठी, हिंदी, भावगीते भक्तिगीते त्याचबरोबर सिनेगीते शिकवण्याचे वर्ग पेठे सेफ्टी लॉकर्सच्या मागे, चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व) येथे गेल्या पाच वर्षापासून सुरू आहेत. या निमित्ताने आपली गाण्याची आवड जोपासण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.
- प्रवेश घेण्यासाठी आपली **आवड व शिकण्याची जिद्द** हीच केवळ अट आहे.
- वयाची कोणतीही अट नसून केवळ **रूपये** २,०००/- महिन्याची फी असणार आहे. हा हॉल पूर्णत: एसी आहे.
- आडवड्यातून दोन दिवस क्लास घेतला जाईल.
- चौदा वर्ष गाणं शिकलेले डॉ.सत्यजित कोसंबी हे हार्मोनियमच्या व तबल्याच्या साथीने गाणी शिकवतात.

सोमवार ते शुक्रवार
५.३० ते ६.३०
६.३० ते ७.३० व
७.३० ते ८.३० वाजता

**अधिक माहितीसाठी संपर्क करा.**
**डॉ. सत्यजित कोसंबी - 8600640400**
**ठिकाण :-** पेठे सेफ्टी लॉकर्सच्या मागे, **चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व).**
**एकदा अवश्य संपर्क करा .. मग ठरवा !!!**

# सिलोलीची अद्भुत दुनिया - २

देशोदेशी

मागच्या अंकात उल्लेख केलेल्या लगुनाहोंडाचे फोटो (पहा मागील भागातील शेवटचा फोटो) काढून होईपर्यंत सूर्य पश्चिमेकडील माऊंट अरारालच्या (१९०००फूट) उंच शिखराच्या मागे जाऊ लागला. आधीच आम्ही समुद्रसपाटीपासून जवळजवळ १४००० फुटांवर असल्यामुळे थंडी वाजतच होती. त्यात थोडीशी उब देणाऱ्या किरणांनी पळ काढायला सुरुवात केल्यावर थंडीने नाकाचा शेंडा आणि कानांच्या पाळ्यांचे लचके काढायला सुरुवात केली. त्यामुळे आम्ही माउंट ट्रेसपुंतास (मराठीत त्रिशूल) हे उत्तुंग शिखर उजव्या बाजूला टाकून आमच्या रात्रीच्या निवाऱ्याच्या - टेकाडे लदेसीएर्तो (अक्षरश: वाळवंटातील आसरा) - दिशेने गाडी काढली. डोक टेकायला जागा होती, शेकोटीच्या बाजूला बसून पोटाला आधार द्यायला गरम सूप आणि रोस्ट चिकन होतं, रात्री बर्फ पडलाच तर डोक्यावर छत होतं. आणखी काय पाहिजे? रात्री बर्फ काही पडलं नाही पण रात्री शून्याखाली तापमान गेल्यामुळे थिजलेले दवबिंदूंचे स्फटिक सकाळच्या कोवळ्या उन्हात हिऱ्यांसारखे चमकत होते.

सकाळी आम्हाला पहिलं ठिकाण गाठायचं होतं ते म्हणजे आर्बोलदपीद्रा (मराठीत अश्मवृक्ष). दगडाचं झाड? प्रागैतिहासिक काळातील भौगर्भिक उत्पातांच्या ज्या खुणा अजूनही मागे राहिल्या आहेत त्यातीलच ही एक. झाडाच्या आकाराची १५-२० फूट उंचीची शिळा! **(पहिला आणि दुसरा फोटो. फोटोत उजवीकडे मागे सुप्त ज्वालामुखी कौवाना १८००० फूट)**. पण नुसतं हे दगडाचं झाडंच





नव्हे तर येथे संपूर्ण पठारावर, मागील अंकात आपण पाहिलेल्या वॅलेदरोकास सारखेच चित्र विचित्र आकारांत निसर्गानेच कातलेले प्रचंड कातळ पसरलेले होते. पण ह्या वैराण दिसणाऱ्या वाळवंटातही जीवन सुखरूप आहे ह्याचा पुरावा देणारा एक कुल्पेओ (लांडग्याचा मावस भाऊ) सुद्धा तेव्हढ्यात एका कातळामागून डोकावून गेला. ह्या सर्व दृश्याला पार्श्वभूमी होती सिलोली वाळवंटाच्या विलक्षण नारिंगी, तपकिरी रंगछटांची. मी माझ्या प्रवासांत अनेक वेगवेगळी वाळवंट पाहिली - राजस्थानातील थर, आफ्रिकेतील सहारा, मंगोलियातील गोबी, अमेरिकेतील मोहेव, पण असे चमकदार रंग पहिल्यांदाच पाहत होतो.

पण निसर्गाच्या रंगसंगतीचा एक वेगळाच चमत्कार आणखी तासाभरातच आम्हाला दिसणार होता, हे मात्र आमच्या गाईडने आम्हाला सांगितलं नव्हतं! ''हा पहा लगूना कोलोराडा'' एका टेकाडाला वळसा घालून पुढे गेल्यावर आमचा गाईड म्हणाला. 'कोलोराडा'??? ह्या स्पॅनिश नावाप्रमाणे बघितलं तर समोरच्या विस्तीर्ण सरोवराचा रंग लाल, तांबडा असायला हवा होता. समोर तर डोळ्यांना सुखावणारी निळाई पसरलेली होती. लाल रंगाचे ठिपके फक्त त्या पाण्यात फिरणाऱ्या फ्लेमिंगोच्या पंखांवर दिसत होते. ''थांबा, थोडा धीर धरा, सूर्य अजून पूर्ण वर आला नाही आहे'' आमचा गाईड म्हणाला आणि खरंच जसजसा सूर्य पलीकडच्या डोंगराआडून वर आला तसतसा एखादा प्रचंड कुंचला समोरच्या त्याहूनही प्रचंड कॅनव्हासवर फिरवा तसा सरोवराच्या पलीकडच्या काठापासून आमच्या समोरच्या पाण्यावर गुलाबी रंग पसरत आला आणि पाण्याची निळाई हळू हळू नाहीशी झाली. **(पहा पुढचे दोनफोटो - पोचलो तेंव्हाचा आणि पाऊण तासा नंतरचा)**. आम्ही जर





मध्यान्ह होईपर्यंत तिथे थांबलो असतो तर कुंकवासारखा लाल रंगही दिसला असता. पण आम्हाला असे अनेक चमत्कार वाटेत पाहून संध्याकाळच्या आत चिले देशाची सीमा ओलांडणं जरूरीच होतं.

आमचा पुढचा थांबा होता सोलदमन्याना (शब्दश: 'उगवता सूर्य'). नरकात जाणाऱ्या पापात्म्यांना उकळत्या पाण्याच्या कुंडात किंवा गरमतेलाच्या कढईत बुडविण्याची शिक्षा अनंत कालपर्यंत दिली जाते असं म्हणतात. नरकाचीही कल्पना सोलदमन्याना सारख्या एखाद्या जागेवरूनच कोणाला तरी सुचली असणार **(पहा पाचवा फोटो)** कारण एका मोठ्या पठारावर इथे



आहेत सर्वत्र पसरलेली उकळत्या पाण्याची उंच उडणारी कारंजी, तप्त गंधकाची डबकी, आत पडलात तर क्षणात हाडं सुद्धा विरघळून जातील अशी वाफेचे बुडबुडे येणारी दलदल.

निदान इथल्या सर्व गोष्टींमध्ये काहीतरी सुसंगती होती - डबकी, झरे, कारंजी, दलदल, सर्वच जाळून / भाजून जीव घेणारी. पण आणखी थोडं पुढे गेल्यावर आलं सरोवर लगुना सलादा (मराठी मध्ये खारं सरोवर) आणि तेर्मास दपोल्कस (शब्दश: मराठीत; गरम झरे) ही छोटी वस्ती **(पहा सहावा फोटो)**. एकाच




सरोवराच्या एका कोपऱ्यात सुमारे ४५ सेल्शिअस म्हणजे अंगाला चांगले चटके बसतील इतकं गरम तर दुसऱ्या बाजूला बोट बुडवलं तर गोठून जाईल एव्हढं थंड पाणी. आम्ही एकीकडे काठावर नखशिखांत गरम कपडे घालून थंडीपासून आपला बचाव करत होतो, तर त्या गरम पाण्याच्या भागात कोणीतरी दोघे नुसत्या चड्ड्या घालून पोहत होते! आम्हालाही त्यात एक डुबकी मारायला चाललं असतं पण दुपारी ३ वाजायच्या आत बोलिव्हियाची सीमा ओलांडून चिले मध्ये प्रवेश करणं जरूरीच होतं कारण त्यानंतर चिलेची इमिग्रेशनची चौकी बंद झाली असती आणि आम्हाला आणखी एक रात्र त्या वाळवंटात १४००० फुटांवरील रक्त गोठविणाऱ्या थंडीत कुडकुडत घालवावी लागली असती (शेवटी झालं तसंच, पण त्या गोंधळाची कथा पुन्हा कधीतरी). त्यामुळे लगुना सलादावरून वाटेत लागणाऱ्या लगुना बियांका आणि लगुना व्हर्दे (मराठीत सफेद आणि हिरवे सरोवर) सारख्या अनोख्या रंगांच्या सरोवरांची शोभा बघण्यात सुद्धा फार वेळ न घालवता गाडी हितोकाहोनच्या सीमेवरील वस्तीच्या दिशेने भरधाव सोडली.

ह्या पूर्वी मी वाळवंट अनेक पाहिली - थर, कच्छचं रण, सहारा, मंगोलियात तर उलानबतार ह्या राजधानीच्या ठिकाणी जाताना मी एक संपूर्ण दिवस प्रवास गोबी वाळवंटातून केला होता. ह्या सर्व ठिकाणांचा स्थायी भाव म्हणजे सर्वत्र असणारा एक सारखेपणा - कुठल्याही दिशेला पहा, तेच ते दृश्य, तेच वाळूचे ढिगारे, तोच एक रंगी रखरखाट. सिलोली वाळवंटासारखं वैविध्य, रंगांची उधळण **(ह्या शेवटच्या फोटो**



**मध्ये रंगांच्या किती छटा आहेत त्या मोजा)**, धूर ओकणाऱ्या जागृत ज्वालामुखीपासून डोळे निववणाऱ्या निळ्या सरोवरांपर्यंत दिसणारे अनेक चमत्कार मात्र मी कधीच अनुभवले नव्हते.

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९



# नुकताच मराठी राजभाषा दिन साजरा झाला. कोवळ्या वयात आमच्यावर भाषेचे संस्कार करणाऱ्या पार्ल्यातील मराठीच्या सर्व गुरुजनांना शतशः नमन



सौ. राजश्री उमेश जडियार
पार्ले टिळक विद्यालय
मराठी माध्यम माध्यमिक विभाग,
सहाय्यक शिक्षिका,
अनुभव - २२वर्षे

सौ. प्रिती विश्वास मोदगी
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक शाळा(मराठी माध्यम)
सहाय्यक शिक्षिका
सेवा कालावधी -३१ वर्षे

सौ. संगिता अरूण पाटील
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक मराठी शाळा
सहाय्यक शिक्षिका
सेवाकाल पूर्ण-२४वर्षे

श्रीमती स्नेहा विजय नाचणकर
सहशिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
मराठी माध्यम

सौ मधुर मनोजव करंबेळकर
पार्ले टिळक विद्यालय
इंग्रजी माध्यम, प्रथमीक
सहशिक्षिका

सौ. प्रज्ञा सदाशिव मोघे
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक शाळा (मराठी माध्यम)
सहाय्यक शिक्षिका
३१ वर्षे कार्यरत



सौ. शुभांगी संजय दाबके
ग्रंथपाल आणि मराठी शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय,
इंग्रजी माध्यम, प्राथमिक विभाग

लतिका नीळकंठ ठाकूर
मुख्याध्यापिका
पार्ले टिळक विद्यालय
माध्यमिक विभाग, मराठी माध्यम

सौ. ऋतुजा संजय शिर्के
सहाय्यक शिक्षिका
परांजपे विद्यालय माध्यमिक शाळा

सौ. माधुरी सुहास जोशी
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक शाळा, मराठी माध्यम
सहाय्यक शिक्षिका,
सेवा कालावधी ३० वर्षे

श्री. तुकाराम वक्रा कोळी
सहायक शिक्षक
परांजपे विद्यालय
प्राथमिक शाळा

सौ. मीरा गजेंद्र कानडे
पार्ले टिळक विद्यालय,
मराठी माध्यम, माध्यमिक शाळा
सहाय्यक शिक्षिका



श्री. विनोद भाऊराव जगताप
सहाय्यक शिक्षक
पार्ले टिळक विद्यालय
माध्यमिक शाळा
(मराठी माध्यम )


सौ. स्नेहल शशांक भावे
पार्ले टिळक विद्यालय
(आय.सी.एस्.ई.)
सहशिक्षिका -(प्राथमिक विभाग)

सौ. ज्योती संदीप दांडेकर
पार्ले टिळक विद्यालय
(आय.सी.एस्.ई.)
सहशिक्षिका -(प्राथमिक विभाग)

कु. निकिता चंद्रकांत मालप
पार्ले टिळक विद्यालय
(आय.सी.एस्.ई.)
सहशिक्षिका - (प्राथमिक विभाग)

सौ. भाग्यश्री शशांक बर्वे
सहाय्यक शिक्षिका
परांजपे विद्यालय,
माध्यमिक विभाग

अन्वया अविनाश काणे
पार्ले टिळक विद्यालय
इंग्लिश मिडीयम स्कूल



सौ. प्रीति प्र. इस्वलकर
पार्ले टिळक विद्यालय
(आय सी एस ई)
सहायक शिक्षिका

सौ. रुपाली बोराडे
सहाय्यक शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
(आय. सी. एस. ई.)

स्मिता शिरीष बिवलकर
उपमुख्याध्यापिका
पार्ले टिळक विद्यालय
इंग्रजी माध्यम

सौ. हर्षदा हरिश्चंद्र चव्हाण
मुख्याध्यापिका
पार्ले टिळक विद्यालय
मराठी प्राथमिक शाळा
सेवा कालावधी ३५ वर्षे

डॉ. संदीप कदम
साहाय्यक प्राध्यापक
साठये महाविद्यालय

प्रा. समीर जाधव
प्रमुख, मराठी विभाग,
साठये महाविद्याय



सौ. रश्मी राजेश पटवर्धन
सहाय्यक शिक्षिका
परांजपे विद्यालय
माध्यमिक शाळा

सौ. सुखदा महेश जोगळेकर
पार्ले-टिळक विद्यालय
इंग्रजी माध्यम
माध्यमिक शाळा
सहाय्यक शिक्षिका

राशी करेश सुर्वे
परांजपे विद्यालय,
माध्यमिक शाळा
साहाय्यक शिक्षिका

सौ. मनिषा चेतन वाळिंजकर
सहाय्यक शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
(मराठी माध्यम), माध्यमिक

सौ. मधुरा हर्षवर्धन पाटील
पार्ले टिळक विद्यालय
(माध्यमिक विभाग)
मराठी माध्यम
सहाय्यक शिक्षिका

सौ. प्रणाली प्रदीप भोवड
पार्ले टिळक विद्यालय,
माध्यमिक विभाग,
मराठी माध्यम
सहाय्यक शिक्षिका



वसुधा उत्तम कारंडे
सहाय्यक शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
(मराठी माध्यम)
माध्यमिक विद्यालय


सौ. लता राजू सूर्यवंशी
पार्ले टिळक विद्यालय
माध्यमिक विभाग
मराठी माध्यम
सहाय्यक शिक्षिका

हर्षदा महेश मुलमुले
सहाय्यक शिक्षिका
पि. टी. वी. ए
इंग्लिश मिडीयम स्कूल
अंधेरी

सुप्रिया सिद्धेश साळकर
सहाय्यक शिक्षिका
पि.टी.वि.ए
इंग्लिश मिडीयम स्कूल
अंधेरी

अश्विनी आनंद नरवणे
हंगामी शिक्षिका
पि. टी. वी. ए.
इंग्लिश मिडीयम स्कूल
अंधेरी पूर्व

सौ. अंजली प्रशांत प्रभुकेळुसकर
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक शाळा (मराठी)
सहाय्यक शिक्षिका
सेवाकाल - ३० वर्षे



ज्योत्स्ना श्रीकर कापूसकर
सहाय्यक शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक शाळा, मराठी माध्यम
सेवाकालावधी - ३३ वर्षे

सौ. मिनाक्षी महेश गोरिवले
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक शाळा
मराठी माध्यम
सेवा कालावधी - २९ वर्षे ८ महिने

राधिका किरण गोडांबे
शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
प्राथमिक शाळा, मराठी माध्यम

सौ. ललिता किरण माने
सहाय्यक शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
मराठी माध्यम
माध्यमिक विभाग

आरती शिरीष हळबे
सहाय्यक शिक्षक
पि.टी.वि.ए.
इंग्लिश मिडीयम स्कूल, अंधेरी

सौ. प्रियांका प्रशांत बर्वे
परांजपे विद्यालय
प्राथमिक शाळा
सहायक शिक्षिका



सौ. घाटे शांती संतोष
परांजपे विद्यालय
सहाय्यक शिक्षिका

मधुरा डबिर
सहाय्यक शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
मराठी माध्यम
माध्यमिक विभाग

सौ. सरोजिनी जयभारत तरकर
सहशिक्षिका
३२ वर्षे नोकरी

सौ. हेमलता पोपट भंडलकर
सहाय्यक शिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय

सौ. कोमल येवले
सहशिक्षिका
पार्ले टिळक विद्यालय
इंग्रजी माध्यम
प्राथमिक विभाग

# तन रंगीला मन रंगीला...

गुरुकुल

श्री. संजीव कानिटकर विलेपार्ले येथील सुप्रसिद्ध तबलातरंग वादक तसेच तबला प्रशिक्षक. जन्म २ ऑक्टोबर १९६० साली मुंबई येथे. वैद्यराज कै. कृष्णाजी कानिटकर आणि कै. सौ. पद्मजा कानिटकर यांचे थोरले चिरंजीव. पार्ले टिळक शाळेचे विद्यार्थी. रीतसर तबला प्रशिक्षण घेतलेले नाही, तरी आवड म्हणून शाळेत असताना पोवाडे, गाणी, नृत्य, यांच्यासाठी तबला साथ करीत असत. वडील सुप्रसिद्ध वैद्यराज तर आई गृहिणी. परंतु मातुल घराण्यात संगीताची परंपरा असल्याने आई उत्तम



तबला वाजवत असे. पार्लेश्वर मंदिरात संध्याकाळच्या भजनाला आई तबल्याची साथ करीत असे. धाकटे दोघेही बंधू वडिलांप्रमाणे आयुर्वेदिक डॉक्टर आहेत आणि मातुल घराण्यातील संगीताची आवड त्यांनी ही घेतली आहे.

संजीवजींचे सर्वात मोठे मामा कै. जनार्दन अभ्यंकर, दादर येथे व्यास संगीत विद्यालयात गाणं शिकवीत असत. कॉलेज संपलं की संजीव त्यांच्या क्लासमध्ये जाऊन त्यांच्या विद्यार्थिनींना तबल्याची साथ करीत. मामा जागतिक किर्तीचे तबलातरंग वादक होते. श्रीमती मेनका सोखी या एकोणिसाव्या शतकातील जागतिक किर्तीच्या कथक नृत्यांगनेसह जग फिरून आले होते. ते नृत्याकरिता मेंडोलिन, सरोद, पखवाज यांच्याबरोबर, मुख्यत्वे करून तबला तरंगाची साथ करीत. दुसरे मामा पंडित राम अभ्यंकर. गाणं तसेच सतार, पेटी आणि जलतरंग वाजवित असत. तिसरे मामा काशिनाथ अभ्यंकर तबला आणि पखवाज एक्सपर्ट होते.

संजीव १९७७ साली मॅट्रिक झाले आणि चेतना कॉलेज, वांद्रे-पूर्व येथे कॉमर्सला प्रवेश घेतला. कॉलेजात त्यांच्यातील प्रतिभेला विशेष वाव मिळाला. तबलावादन, नाट्यसंगीत, वक्तृत्व, जलतरंग वादन अशा साऱ्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या स्पर्धांमधून ते चेतना कॉलेजतर्फे उतरत असत. बहुतेक वेळा त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ग्रॅज्युएशन नंतर जवळपास वीस वर्षे नोकरी केली. या काळात तबला शिकवणं चालू होतं. कॉलेजात असतानाच कविता करायला सुरुवात केली होती. अनेक बंदिशीही रचल्या. स्वरमंडल या वाद्यवृंदाची स्थापना करून मराठी-हिंदी गीतांचे कार्यक्रम केले. सलग दहा वर्षे सुगम तबला कार्यशाळा घेतल्या. तबल्याचं महत्त्व मुलांना पटवून देण्यासाठी वेगवेगळ्या घराण्यांचे तबलजी बोलावून मुलांना प्रात्यक्षिके दाखवित असत. दहा वर्षे मुलांच्या पालकांसह गुरुपौर्णिमा साजरा केल्या.

मोठे मामा प्रत्येक गणपतीत एक दिवस घरी तबलातरंग वाजवीत. त्यांच्यामुळे बरेचसे तरंग माहिती झाले होते. संजीव यांना वयाच्या पस्तिशीत इच्छा झाली की आपणही तरंग शिकावेत. घरी काचेचे bowls आणून त्यात पाणी भरून स्वर लावून अंदाजे प्रॅक्टिसला सुरुवात केली. जनार्दन मामा जागतिक ख्यातीचे वादक, पण वयामुळे शिकविण्यास असमर्थ होते. राम मामांनी ही जबाबदारी घेतली. पेटीवर राग वाजवून दाखवीत आणि आता तुकडे वाजवून दाखव असे त्यांना सांगत. अशा पद्धतीने संजीव शिकत गेले. सामान्य लोकांना तबलातरंग हे तालवाद्य आहे असे वाटते. पण तबला हे ताल वाद्य आहे. तरंग हे तालवाद्य नाही. स्वरवाद्य आहे. त्यासाठी वेगवेगळ्या स्वरातील आठ ते दहा तबले नीट सुरात लावावे लागतात आणि बासरी किंवा मेंडोलिन सारखे यावर तुकडे वाजवतात. चित्रपटातून गाण्याला किंवा पार्श्वसंगीताला उठाव येण्यासाठी हे तुकडे



वापरतात.

संजीव यांनी १९९३ ते १९९६ तीन वर्षे तबलातरंगाची कसून प्रॅक्टिस केली. मामांकडे जाऊन दिवसातले ९-९ तास रियाज केला. एका मिनिटात साठ ताना वाजवत. एवढी तयारी झाली होती. त्यामुळे चित्रपटांतून गाण्यांची कामे मिळू लागली. पहिला चित्रपट प्रेमग्रंथ. लक्ष्मी-प्यारे यांचं संगीत. बॅकग्राऊंडसाठी पीस वाजवायचे होते. हे काम जास्त प्रतिष्ठेचं समजलं जातं. देवदास, हम दिल दे चुके सनम अशा अनेक चित्रपटांतील गाण्यांसाठी काम केलं. साज या चित्रपटात शबानाबरोबर तबलजीचं काम केलं आहे. संजीवजींनी मॉडेलिंगही केलं आहे. यूटीआयच्या जाहिरातींच्या मोठ्या होर्डिंग्जवर झळकले आहेत.

जनार्दन मामांकडे तबल्याची साथ करत असताना शास्त्रीय संगीतातील राग कानांवर पडत असत. ते आत मुरले होते. तसंच नोकरी करताना कामाची वेळ संपल्यानंतर एनसीपीएला जाऊन तीन तीन तास बसून संगीत विषयाचा अभ्यास चाले. अभ्यास करताना असं वाटलं हे सगळं खूप क्लिष्ट भाषेत आहे. आपण सोपं करून सांगितलं पाहिजे. संजीवजी आपल्या विद्यार्थ्यांना, शास्त्रीय संगीतातील तीव्र मध्यम म्हणजे काय? सूर कोमल कसा होतो? वर्ज्य म्हणजे काय? आरोह-अवरोह, वादी-संवादी, तसेच हार्मोनियममधील बेसिक माहिती देतात.



त्यामुळे संगीताचं प्रशिक्षण घेणं सोपं जातं. या जोडीला मित्रत्वाची वागणूक. त्यामुळे त्यांचे विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध राहिले आहेत. गेली चाळीस वर्षे ते तबला शिकवत आहेत. आजवर शेकडो विद्यार्थी त्यांच्याकडून शिकून गेले, अनेक जण शिकत आहेत. ५ वर्षे ते ९५ वर्षे सर्व वयातले विद्यार्थी त्यांच्याकडे शिकले आहेत.

संजीव कॉलेजात असताना कविता करत होतेच; शास्त्रीय संगीताच्या अभ्यासामुळे बंदिशीही बांधू लागले. चीज आणि बंदिशीतील फरक सांगताना ते म्हणतात, चार ओळींचं काव्य म्हणजे चीज आणि जेव्हा ती रागात बांधली जाते तेव्हा तिची बंदिश होते. ऐसा रंग दे मोहे, ही शंकरा रागातील स्वरचित बंदिश अप्रतिम अशीच आहे. २००२ मध्ये संजीव यांच्या कवितांचा पहिला काव्यसंग्रह, 'तन रंगीला मन रंगीला', दत्ता डावजेकर, मंगलाताई खाडिलकर या मान्यवरांच्या उपस्थितीत प्रसिद्ध झाला.

२०१२ साली 'रचना' हा संजीवजी आणि चेतना उमर्जी यांनी केलेला अल्बम प्रसिद्ध झाला. यात १६ रागांतील १६ बंदिशी, झूला, ठुमरी, दादरा हे उपशास्त्रीय प्रकार, सुगम संगीतातील नांदी, भजन, गुरुमहिमा, रास-गरबा, लोरी असे एकूण २८ गानप्रकार आहेत आणि ते सारे हिंदीत आहेत. या साऱ्या ६ रचना दोघांनी मिळून केल्या आहेत. संजीवजींनी थाटांचं विलक्षण असं लक्षण गीत केलं आहे जे आजवर कोणी केलेलं नाही. मुलांना संगीतातले दहाही थाट क्रमवार लक्षात राहण्यासाठी रचलेलं थाटांचं हे लक्षण गीत म्हणजे एक प्रकारे थाटांची बंदिश. याला चाल राम मामा यांनी लावली आहे. त्यांनी १४४ स्वरांचा स्केल चेंजर चार्ट ही तयार केला आहे.

गेली चार वर्षे अनाम प्रेमी या सेवाभावी संस्थेच्या महिलांचा एक ग्रुप संजीवजींकडून वेगवेगळे तरंग शिकत आहे. आपल्याला जलतरंग, तबलातरंग असे मोजकेच प्रकार ठाऊक असतात. परंतु तबला, जल, काष्ठ, लोह, काच, खोपडी, घंटा, मादल, डुग्गी, घुंगरू, पत्थर, बांबू, मटका, पाईप असे तरंग प्रकार आहेत. संजीवजी यातील बऱ्याच प्रकारांत पारंगत आहेत.

१७ फेब्रुवारी २००६ या दिवशी थोर शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्याशी घडलेली भेट आणि संवाद तसंच १९९१ मध्ये येथील श्री स्वामीनारायण मंदिरात तबलातरंग वाजविल्यावर आशीर्वाद म्हणून प्रमुख स्वामींनी स्वतः गळ्यात घातलेला चंदनाचा हार हे संजीवजींच्या आयुष्यातील परमोच्च गौरवाचे क्षण आहेत.

संजीवजी यांना पुढील वाटचालीसाठी आणि उत्तम आयुरारोग्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

**अनुश्री क्षीरसागर**
**९८२०५०९७६२**



**मनोरंजन विश्व**


# रौद्र



आपल्याला रहस्यमय चित्रपट पाहायला आवडत असतात. एखाद्या गावात, तिथल्या माणसांच्या स्वभावात सुद्धा काही रहस्य दडलेली असू शकतात. त्या रहस्याचा शोध घेताना त्या रहस्याचे एक वेगळे रूप समोर येते आणि ते रूप म्हणजेच 'रौद्र' नावाचा चित्रपट. लवकरच हा चित्रपट आपल्या भेटीला येणार आहे.

१९७० चा काळ आहे आणि त्यात 'वडगाव' नामक एक ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेलं गाव आहे. त्रिंबक कुरणे नामक जनगणना अधिकारी जनगणनेच्या निमित्ताने वडगांवला येतो. त्रिंबकला इतिहासात रुची असते.नानासाहेब कुलकर्णी हे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती. ते त्रिंबकची राहण्याची सोय त्यांच्या जुन्या वाड्यावर करतात. त्या वाड्याबदद्ल खूप अफवा असतात. वाडाही भव्य व भयानक असा असतो. काही दिवसात त्रिंबकला तिथे विचित्र व भयावह आवाज ऐकू येतात. नानासाहेबांकडे एक पुरातन बखर आहे त्यात गावाबद्दल ऐतिहासिक माहिती आहे हे त्रिंबकला समजते. या बखरीत वेगवेगळी कोडी असतात ज्यामार्फत रहस्याचा उलगडा होणार असतो. नायिकेच्या मदतीने कोडयामधील महत्त्वाचा धागा त्याचा हाती लागतो. मात्र या शोधाला अचानक विश्वासघाताचं ग्रहण लागतं,तेव्हा होणारा विनाश आणि त्याचं 'रौद्र' रूप या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात एक प्रेमाची कहाणी देखील आहे.राहुल पाटील आणि उर्मिला जगताप ही नवीन जोडी 'रौद्र' या चित्रपटातून आपल्या समोर येईल. त्यांच्यासोबत दीपक दामले, अनिता कोकणे, अमित पडवणकर, ईशान गटकळ आदी कलाकारांच्या चित्रपटात भूमिका आहेत. चित्रपटाची कथा मंगेश बाळासाहेब गटकळ यांची असून पटकथा आणि संवाद रविंद्र शिवाजी यांचे आहेत. एम. जी पिक्चर्स निर्मित 'रौद्र' 'या चित्रपटाची प्रस्तुती 'अल्ट्रा मीडिया अँड एन्टरटेन्मेंट' प्रा. लि. कंपनीने केली आहे.

# ८ दोन ७५- फक्त इच्छाशक्ती हवी




गेले अनेक महिने आपल्या वेगळ्या शीर्षकामुळे चर्चेत राहिलेला एक चित्रपट म्हणजे '८ दोन ७५ फक्त इच्छाशक्ती हवी'. या चित्रपटानं आतापर्यंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पन्नासहून अधिक पुरस्कार मिळवले आहेत. आजवर अवयव दानावर चित्रपट आलेले आपण पाहिले आहेत. पण 'देहदान'हा विषय असणारा हा पहिला चित्रपट असावा. देहदानाविषयी जागृती करणारा हा मराठी चित्रपट आहे. 'उदाहरणार्थ निर्मित' या निर्मिती संस्थेचे सुधीर कोलते, विकास हांडे, लोकेश मांगडे हे ८ दोन ७५ : फक्त इच्छाशक्ती हवी! या चित्रपटाचे निर्माते आहेत तर सुश्रुत भागवत यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. आजवर फ्रान्स, सर्बिया, सिंगापूर, युनायटेड स्टेट्स, भूतान, यूगोस्लाव्हिया, इटली येथील आंतरराष्ट्रीय फेस्टिव्हल्स सह भारतात, पोंडेचेरी, कलकत्ता, हिमाचल प्रदेश, मुंबई, उटी, सिक्कीम येथील फेस्टिव्हल्समध्ये ह्या चित्रपटास पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

चित्रपटाची पटकथा शर्वाणी आणि सुश्रुत यांनी लिहिली आहे, तर संजय मोने यांनी संवाद लेखनाची जबाबदारी निभावली आहे. अभिनेता शुभंकर तावडे,अभिनेत्री संस्कृती बालगुडे, शर्वाणी पिल्लई, संजय मोने, आनंद इंगळे, राधिका हर्षे - विद्यासागर, अश्विनी कुलकर्णी, विजय पटवर्धन, चिन्मय संत, डॉ .निखिल राजेशिर्के, सीमा कुलकर्णी अशी चित्रपटाची दमदार स्टारकास्ट असून अभिनेता पुष्कर श्रोत्री पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसेल. वैभव जोशी यांचे गीतलेखन आणि अवधूत गुप्ते यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. '८ दोन ७५ फक्त इच्छाशक्ती हवी !' असं नाव आणि देहदान हा विषय ह्याचा संबंध काय हे जाणून घेण्याची उत्सुकता आहे. ते आपल्याला चित्रपट प्रदर्शित झाल्यावरच कळेल .

**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# एप्रिल महिन्यात आयोजित होतोय अनोखा ऑनलाईन प्रॉपर्टी एक्स्पो

## पार्लेबझार डॉट कॉमच्यावतीने करण्यात आले आहे आयोजन




कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून बहुतांश जाहीर कार्यक्रमांवर निर्बंध आले आहेत. त्यामुळे बहुतांश उद्योग-व्यवसायांनी ऑनलाइनची वाट धरली. मात्र, घर खरेदी-विक्रीसाठी अशाप्रकारे काही ऑनलाइन व्यवस्था पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हती. त्यातही मुंबई उपनगरांसाठी तर अजिबातच अशी काही सोय नव्हती. या पार्श्वभूमीवर पार्लेबझार डॉट कॉमच्यावतीने अनोख्या अशा डिजिटल मेगा प्रॉपर्टी एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे.

२५ ते ३० एप्रिल २०२२ दरम्यान www.onlinepropertyexpo.in या वेबसाइटवर सदर अनोख्या एक्स्पोचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये मुंबईसह पुणे, नाशिक अशा विविध विभागांतील मान्यवर डेव्हलपर्स आपल्या प्रॉपर्टीज, वेगवेगळे प्रोजेक्ट्स प्रदर्शित करणार आहेत. यामध्ये वेगवेगळ्या गृहप्रकल्पांबरोबरच सेकंड होम ऑप्शन्स, लँड, प्लॉट्स, इंटिरिअर डिझायनिंग, घरांसाठीचे कर्ज अशा गोष्टींचेही वेगवेगळे पर्याय येथे असणार आहेत. या एक्स्पोच्या माध्यमातून एक्झिबिट करणाऱ्यांनाही खूप कमी किंमतीत भरपूर लोकांपर्यंत पोहोचता येईल आणि त्यांना आपल्या बद्दलची माहिती सहजपणे ग्राहकांपर्यंत पोहोचवता येणार आहे. यामध्ये डेव्हलपर, कन्सल्टंट, आर्किटेक्ट, इंटिरिअर डेकोरेटर, फायनान्स आदींसह प्रॉपर्टीशी निगडित इतर विविध सेवांचा समावेश असणार आहे, त्यामुळे घरांची खरेदी-विक्री करू इच्छिणाऱ्या दोन्ही गटांनी पार्लेबझार डॉट कॉमच्या या विशेष प्रॉपर्टी एक्स्पोचा लाभ घ्यावा असे आवाहन या डिजिटल एक्स्पोच्या आयोजकांनी केले आहे.

हा एक्स्पो अटेंड करण्यासाठी www.onlinepropertyexpo.in या साइटवर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. तेथे नोंदणी केल्यानंतर हॉल्स या पेजवर आपण रिअल इस्टेट प्रोजेक्ट्स्, कन्सल्टंट, अलायइड प्रोडक्ट्स् अॅण्ड सर्व्हिस, लोन्स अॅण्ड फायनान्स, सेकंड होम आदी विविध पर्याय आहेत. त्यावर क्लिक करून त्यातील सेवा पाहता येणार आहेत. या विविध पेजवर क्लिक केल्यानंतर संबंधित विषयाशी निगडित सविस्तर माहिती आणि प्रोजेक्टसची तसेच कंपनीची माहिती, फोटो, व्हिडिओज् आदी पाहता येणार आहेत. त्याचप्रमाणे संबंधित कंपनीच्या प्रतिनिधींसोबत त्याचवेळी ऑनलाइन संवाद देखील साधता येणार आहे.या एक्स्पोमध्ये प्री रजिस्टर केल्यास एक्स्पोबद्दलची माहिती, अपडेट्स वेळोवेळी कळविण्यात येणार आहे. त्यामुळे अधिकाधिक जणांनी यामध्ये आपली नोंदणी करावी असे आवाहन पार्लेबझार डॉट कॉमच्या वतीने करण्यात आले आहे.